# प्रस्तावना

# प्रस्तावना

कोणत्याही एखाद्या विषयाचा अभ्यास, लिखाण किंवा संशोधन करावयाचे असल्यास, इतिहासाच्या सखोल अभ्यासाची आवश्यकता ही असतेच. कारण यामधूनच संशोधन विषयासंदर्भत माहिती मिळते. त्या काळातील विविध टप्पे, बदल, त्यासंदर्भातील व्यापकता याबाबींचे ज्ञान मिळते. त्याबाबतीची संपूर्ण माहिती मिळाल्या शिवाय संशोधन पूर्ण होऊ शकत नाही शिवाय संशोधकास ही स्वत:चे मत वा निष्कर्ष काढता येत नाही.

कोणतीही गोष्ट हि व्यक्तीला सभोवतालच्या परिस्थितीचे विश्लेषण करायला शिकविते. स्त्री पुरूष विषमतेवर आणि स्त्रियांच्या शोषणावर आधारित परंपराबाबत डोळसपणे विचार करायला लावते. स्त्रीयांच्या हक्काची, स्वातंत्र्याची न्यायाची जाणीव संघर्षाद्वारे करून द्यावी लागते. यासाठी स्त्री विषयक सामाजिक चळवळीची वा सुधारणा याची गरज असते. आणि स्त्रीवाद हा स्त्रियांच्या सामाजिक चळवळीचा मूळ आधार आहे.

स्त्री अभ्यास हा इतर विषयांपेक्षा वेगळा आहे. याचा अर्थ म्हणजे स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान, त्यांचे होणारे शोषण, त्यांच्यावर केली जाणारी दडपशाही या सर्वांचे संवेदनशील ता आणि सैद्धांतिक निकष या दोन्हीचीही आवश्यकता आहे. यासाठी भूतकाळातील स्त्रीयांची स्थिती अभ्यासणे आवश्यक आहे. यासाठी प्राचीन काळापासून विविध कालखंडात समाजातील स्त्रीयांच्या स्थितीचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.[1]

कोणत्याही विशाल पाया असणाऱ्या तत्वज्ञानात्मक तारतम्याप्रमाणे स्त्रीवाद या एका नावाने विविध विचार प्रवाह ओळखले जातात. कोणतीही या विषयाची यादी पुरी नसते. पण सुरवातीचा

प्रयत्न म्हणून पाहिले असता उदारमतवादी, मार्क्सवादी, प्रखर स्त्रीवादी, समाजवादी, मनोविश्लेषणवादी, अस्तित्ववादी अथवा आधुनिकतेच्या नंतरच्या काळातील असे स्त्री प्रश्नाकडे जाण्याचे वेगवेगळे मार्ग संभवतात. समकालीन स्त्रीवादी विचारवंत पारंपारिक उदारमतवादी स्त्रीविचाराविषयी प्रतिक्रिया व्यक्त करूनच आपली मांडणी करीत असल्याने उदारमतवादी विचारसरणीपासून अभ्यासाला सुरूवात करणे योग्य वाटते. कोणतीही विचारसरणी ज्या काळात निर्माण होते, त्या काळाशी, त्या काळातील मर्मस्थानी असणाऱ्या प्रश्नांशी काही अपरिहार्य नाते ती सांगत असते. त्याकाळातील सामाजिक, राजकीय संरचनांशी त्या विचारसरणीचे अन्वय असतात. उदारमतवादी स्त्रीवादाकडे वळण्यापूर्वी स्त्रीवाद म्हणजे काय हे समजणे आवश्यक आहे.[2]

स्त्रीवादाची नेमकी व्याख्या कोणत्याही स्त्रियांबाबत केव्हाही उपयोगात येईल अशी केली जात नाही. ती कालस्वरूपे, स्थलस्वरूपे बदलत राहते. तेथील स्त्रियांची वर्गीय पार्श्वभूमी, शिक्षण, संवेदनक्षमता, अतिपुरूषप्रधानता व विचारांची पाळेमुळे विचारात घेऊनच स्त्रीवादाचे स्वरूप ठरते. स्त्रीवादात शोषणविरहीत, वर्गवर्णजातीविरहीत, समाजासाठी स्त्रियांचा संघर्ष हा विचार मूलभूत आहे. प्रजोत्पादनासाठी स्त्रियांना गुलाम बनविण्याच्या तत्वाविरुद्धचा हा उठाव आहे. रूढीवाद हा ऐतिहासिक दृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या पक्क्या तथ्यांवर आणि स्त्रीवाद सतर्कतेच्या परिदृष्टीच्या, कृतीच्या पातळ्यांवर आधारित आहे.

एकंदरित स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या शोषणाबद्दल अत्याचारांबद्दल समाजात, कुटुंबात कामाचे जागी जागृती निर्माण करणे, आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी स्त्री पुरूषांनी जाणीवपूर्वक विचार आणि कृती म्हणजे स्त्रीवाद होय.[3]

स्त्रीवादाचे अनेक पैलू आहेत त्यातील महत्वाचे पुढील प्रमाणे :-

## उदारमतवादी स्त्रीवाद : (Liberal feminism)

उदारमतवाद एक राजकीय विचारसरणी म्हणून एकोणिसाव्या शतकाशी जोडलेला असला तरी आज ही या सरणीत संकल्पना आणि संरचना संदर्भात इतका विचार चालू आहे की उदारमतवादी स्त्रीवादाची प्रक्रीया आजमावणे अवघड आहे. उदारमतवादी स्त्रीवादाची अभिजात मांडणी म्हणून दोन पुस्तकांचा निर्देश केला जातो. मेरी वुल्स्टोनक्राफ्ट यांच्या ` A Vindication of the Right of Women` आणि जॉन स्टुअर्ट मिल यांच्या ` The subjection of woman` या पुस्तकांचा. स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान कशामुळे ? या प्रश्नाला उत्तर देताना हि मांडणी म्हणते की रूढी आणि कायद्याचे निर्बंध तिला सार्वजनिक क्षेत्रापासून दूर ठेवतात. समाजाचा असा चुकीचा समज आहे की स्त्री निसर्गत: पुरूषापेक्षा शरीराने दुबळी, बुद्धीने कमकुवत आणि कमी कार्यक्षम आहे. उदारमतवाद्यांच्या मते स्त्रीला वगळण्याची ही जी भूमिका होती त्यामुळे असंख्या स्त्रीयांच्या व्यक्तीमत्वातील सुप्त गुणांचा लाभच समाजाला झाला नाही. समतावादी संस्कारामुळे उदारमतवाद्यांना वाटे प्रत्येकाला शर्यतीत धावण्याची संधी मिळाली पाहिजे, खेळाचे नियम न्याय हवेत. मग काही आम्ही हरणाऱ्यालाही पारितोषिक द्या असे म्हणणार नाहीत. पण स्त्रीला विद्यापीठे, बाजारपेठ, राजकीय व्यासपीठ यापासून दूर ठेवू नका. अशी भूमिका उदारमतवादी स्त्रीवाद्यांची आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री आंदोलन उदारमतवादी दृष्टीकोनातील होता असे म्हटले जाते. स्त्री चिन्तनशील असू शकते, विचार करू शकते. तिलाही समान नागरी अधिकार पुरुषांप्रमाणे मिळायला हवा. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाची संधी मिळायला हवी. तसेच राजकीय प्रक्रियांमध्येही स्त्रियांचा सहभाग हवा. परिवर्तनासाठी कायद्यांत सुधारणा होऊन त्याचा वापर करण्याने समानता मिळेल

असे वाटत असे. 19 व्या शतकातील भारतीय समाजसुधारकांनी स्त्री शिक्षण, सतीची चाल, बालविवाह, विधवा पुनर्विवाह इ. संबंधीचे प्रश्नांचा विचार फक्त बोलण्यातूनच नव्हे तर कृतीतून करण्याचा प्रयत्न केला.

## प्रखर / परिवर्तनवादी स्त्रीवाद (Radical feminism) :

या पद्धतीमध्ये स्त्रीशोषणाचे मूळ कारण म्हणजे कुटुंबसंख्या व लैंगिकतेवर आधारलेली कामांची व सत्तेची वाटणी असे या प्रणालीचे मुख्य विचारसूत्र दिसून येते. स्त्री पुरूषातील नैसर्गिक भेदाचा वापर हा स्त्री पुरूषाच्या कामाच्या व सत्तेच्या अयोग्य विभाजनासाठी केला जातो. समाजात पूर्वीपासून चालत आलेल्या पितृसत्ता व कामेच्छेवरील पुरूषांचे नियंत्रण यामुळे स्त्रियांचे लैंगिक शोषण होत राहीले. स्त्री पुरूषांच्या सामाजिक विषमतेला हा स्त्रीवाद पुरूषांना अधिक प्रमाणात जबाबदार मानतो. अशा पद्धतीची विचारसरणी ही प्रखर स्त्रीवादात आढळून येते.

प्रखर स्त्रीवादी म्हणतात की पितृसत्ताकमुळेच बाईला दडपले जाते. या स्त्रीवाद्यांच्या लेखनात पुन्हापुन्हा येणारे विषयसूत्र म्हणजे स्त्रीच्या जैविक विशिष्टांचा तिच्या आत्मभानावर, सामाजिक स्थानावर, खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कार्यावर होणारा परिणाम. बाईची जी जैविक स्थिती तीच तिच्या दडपलं जाण्याला कारणीभूत आहे. असे मानले जाते. तीच तिला मुक्त करू शकेल असे मानले, म्हणजे पुरुषाला-समाजाला प्रजोत्पादन आणि प्रजासंगोपनासाठी स्त्रीला ताब्यात ठेवावेसे वाटत असेल तर तेच आपले सामर्थ्यस्थान आहे हे ओळखून स्त्रीने स्वयंनिर्णयाचा हक्क बजवावा. प्रजोत्पती, संततीनियमन या विषयीचे केंव्हा आणि कसे वापारावयाचे हे स्त्रीने ठरवावे. अशा विचारांवर आधारीत प्रखर स्त्रीवाद्यांनी ही पद्धत स्पष्ट केली.

## समाजवादी स्त्रीवाद :

समाजवादी स्त्रीवाद्यांच्या मते, खाजगी मालमत्ता या कल्पनेतच स्त्रीच्या दास्याचे मूळ आहे. भांडवलशाहीमुळे हे दास्य टिकून राहिले आहे. जर सर्व स्त्रिया काहीच भाग्यवान नाही, मुक्त व्हायच्या असतील तर आधी भांडवलशाही समाज व्यवस्था नष्ट करून समाजवादी समाजरचना निर्माण व्हायला हवी अशी त्याची मांडणी होती. अर्थात त्यामागे आर्थिक स्वातंत्र्याने आपोआप समता मिळेल असे समीकरण होते. [4]

या स्त्रीवादामध्ये स्त्रीयांच्या दुय्यम स्थानाचे मूळ कारण खाजगी संपत्ती व वर्गविभाजित समाजरचना मानल्याचे दिसून येते. कुटुंबासारख्या सामाजिक संस्था ही स्त्रियांचे दुय्यम स्थान कायम ठेवीत असतात. व्यक्ती विशिष्ट वर्गातील असणे हे सत्ता मिळण्यासाठी लिंगभेदाप्रमाणे कारणीभूत ठरते. पितृसत्ता व वर्गावर्गांमधील संघर्षामध्ये ही हिच बाब आढळते. समाजवादी दृष्टीकोन असलेल्या स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्रियांची शक्तीहिनता, सत्ताहीनता ही प्रजनन, उत्पादन, कामेच्छा त्याचप्रमाणे बालकांच्या सामाजिकी करणावर आधारीत आहे. यासाठी स्त्रीसंघटनांनी स्त्रीयांबद्दलच्या मुद्यांवर आपले लक्ष केंद्रीत करण्याबरोबरच समाजातील अन्य पीडित व शोषित वर्गाच्या संघर्षाशीही आपले आंदोलन जोडावे. [5]

अशा प्रकारचे आणखीही काही दृष्टिकोन असले तरी वरील प्रकाराइतके महत्त्वाचे नाहीत. एकूण काय सर्व स्त्रीवादी हे स्त्रियांना सर्व प्रकारच्या शोषणातून, अन्यायातून भेदाभेदातून मुक्त करू इच्छितात. त्यासाठी सर्वंकष संघर्षांवर भर देतात. समाजातील सामान्य स्त्रियांना समता, सन्मान, व स्वातंत्र्य मिळवून देऊन कुटुंबाबाहेर त्यांना स्वत:च्या जीवनावर, शरीरावर स्वत:चा हक्क मिळवून देऊ इच्छितात. अशा प्रकारची विचारसरणी असलेले अनेक पुरूष स्त्रीवादी आहेत. स्त्रियांबाबतच्या सामाजिक परिवर्तनाचे प्रेरक राजाराममोहन रॉय, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशांसारखे पुरूष स्त्रीवादाचे

पुरस्कर्तेच असल्याचे दिसून येते. [6]

अशा स्त्रीवाद्यांपैकीच एक महात्मा जोतीराव फुले हे आहेत. ज्यांनी महाराष्ट्रामध्ये प्रथम पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांचा शोध घेऊन त्या विरूद्ध मूलभूत तथ्यांसह लढले. त्यांनी लैंगिक भेदातून होणारे शोषण व विषमता जाणून घेतले. त्यांनी पुरूषांचे वर्चस्व आणि पुरूष प्रधानता समजून घेऊन त्या विरुद्ध कृती केली. त्यांचा स्त्रीवाद हा इतरांना फक्त उपदेश करणारा किंवा व्यासपीठावर बोलण्यापुरता नव्हता. तर त्यांच्या स्त्रीवादामध्ये विचार वृत्ती आणि कृती यांची सांगड असलेली दिसून येते. त्यांनी समाजातील स्त्रियांची स्थिती जाणून घेऊन स्त्रीशिक्षणाचे कार्य, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, परित्यक्त्यांचे प्रश्न इ. स्त्री विषयक केलेले कार्य हे पूर्णपणे उदारमतवादी स्त्रीवादातीलच असलेले दिसून येते.

## : संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| 1. | नीरा देसाई, मैत्रेयी कृष्णराज<br>अनुवाद : उषा मेहता | स्त्री अभ्यास म्हणजे काय?<br>प्रकाशक -महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ, मुंबई, 1ली आवृत्ती 1998<br>पृ. क्र. 9 |
| 2. | पुष्पा भावे | उदारमतवादी स्त्रीवाद<br>चर्चासत्र निबंध 9/10/93<br>पृ. क्र. 1व 2 |
| 3. | डॉ. सीमा साखरे | स्त्रीवाद<br>प्रथमावृत्ती, 1994<br>पृ. क्र. 12 |
| 4. | पुष्पा भावे | उपरोक्त पृ. क्र. 2 ते 5 |
| 5: | NEERADESAI & MAITHREYI KRISHNARAJ | Women & Society in India<br>Ajanta Publication, Delhi. first Published 1987, P.N. 17 to 18 |
| 6. | डॉ. सीमा साखरे | उपरोक्त पृ. क्र. 15 ते 17 |


****